# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, छत्रपती संभाजीनगर विभागीय मंडळ, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर

Email: chair.aurboard@mahedu.gov.in/sschscboardabad@gmail.com
Tel: Div.Chairman(P) : (0240):2331116 EPABX -2334228/2334284 Div. Secretary (P) :2341035


अत्यंत महत्त्वाचे

जा.क्र.छसंविमं/उमाक/ 04
दिनांक:- 01/04/2026

प्रति,
मुख्याध्यापक /प्राचार्य
सर्व मंडळ मान्यताप्राप्त,
माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये
छत्रपती संभाजीनगर/बीड/जालना/परभणी/हिंगोली.

**विषय :- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा इ.१० वी व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा इ.१२ वी गुणपत्रक व प्रमाणपत्राबाबत**

संदर्भ :- 1. दिनांक १२ फेब्रुवारी २०२६ चा कार्यकारी परिषद ठराव कं.११४
2. क्र.रा.म/ परीक्षा-७/१३३७ पुणे ४११००४ दिनांक २५/०३/२०२६ रोजीचे पत्र

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भिय ठरावानुसार फेब्रुवारी-मार्च २०२६ परीक्षेपासून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ १२ वी) परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थ्यांना गुणपत्रक व प्रमाणपत्र स्वतंत्र न देता ती एकत्रित देण्यात येणार आहेत. तसेच एकत्रित गुणपत्रक व प्रमाणपत्रावर विद्यार्थ्यांचे नाव FIRST NAME, FATHER NAME, SURNAME या क्रमाने छपाई करण्यात येणार आहे.

फेब्रुवारी मार्च २०२६ च्या प्रवेशपत्रांवरील छायाचित्र अस्पष्ट असल्यास, त्यावर योग्य फोटो चिकटवून संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांना स्वाक्षरी करण्याचे निर्देश यापूर्वी दिलेले आहेतच त्यानुसार जर विद्यार्थाचे फोटो अस्पष्ट अथवा दुरुस्त केले आहेत. त्यांची माहिती एकत्रित गुणपत्रक व प्रमाणपत्रावर अचूक छापण्यासाठी पुन्हा अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांचे नाव दुरुस्ती संदर्भात मुख्याध्यापक / प्राचार्य,स्तरावर शहानिशा खात्री करण्यात यावी त्याकरिता मंडळाच्या संकेत स्थळावर PHOTO CORRECTION लिंक कार्यान्वित करण्यात आली आहे. त्याद्वारे आवश्यक दुरुस्ती करण्यात यावी कोणताही विद्यार्थी सदर दुरुस्ती करण्यापासुन वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.

(प्र.)विभागीय सचिव,
विभागीय मंडळ, छत्रपती संभाजीनगर

प्रत माहितीस्तव —
मा.सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, शिवाजीनगर पुणे-०४